विशेष दिवाणी दावा क्र २०८/२०२३
संजय वि भिमराव
निशाणी क्र ८१

**वादीतर्फे साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास सुरु प्रतिवादीतर्फे वकील, श्री देशमुख**

१. मी मजूरी करतो. मी कुर्डुवाडी गावी ग्रामीण रुग्णालयाच्या मागच्या बाजुला राहतो. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकत आणि मी राहतो त्या जागे दरम्यान अंदाजे १ किलोमीटर अंतर आहे. वादी माझा साडभाऊ आहे. माझे आणि वादीचे एकमेकांकडे येणेजाणे आहे. माझे व वादी दरम्यान भांडणतंटा नाही.

२. वादीच्या घरजागेचे सिटी सर्व्हे क्रमांक, क्षेत्रफळ मला माहिती नाही. प्रतिवादीच्या घरजागेचे सिटी सर्व्हे क्रमांक, क्षेत्रफळ मला माहिती नाही. वादी व प्रतिवादीच्या घरादरम्यान मोकळी जागा आहे, त्या जागेचे क्षेत्रफळ, सिटी सर्व्हे क्रमांक मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादीच्या घराची लांबी पुर्व-पश्चिम दिशेमध्ये आहे. त्यांच्या घरादरम्यान असलेली मोकळी जागा देखील पुर्व-पश्चिम लांबीची आहे. वादी, प्रतिवादी व त्यांच्या घरा दरम्यान असलेल्या मोकळ्या जागेच्या पश्चिमेस उत्तरेकडे पटेल चौकाकडे जाणारा रस्ता आहे. वादीने त्याच्या जागेत दोन खोल्या बांधल्या आहेत व त्यातील पश्चिमेकडील खोलीला पश्चिमेकडील रस्त्याला लागून दरवाजा काढला आहे. वादी व प्रतिवादी दरम्यान असलेल्या मोकळ्या जागेला लागून वादीची जी खोली आहे त्यास वादीने दरवाजा व दोन खिडक्या उघडलेल्या आहेत. वादी क्र २ ची पुर्वेकडील बाजुला वागणूक (entrance) आहे. प्रतिवादीने त्याच्या जागेच्या बांधकामामध्ये पिलरची उभारणी केली आहे व त्यावर बीम टाकले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने त्याच्या जागेमध्ये बांधकाम केले आहे. मी पंधरा दिवसांपूर्वी वादजागेमध्ये गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादीचे घरा दरम्यान अंदाजे ३ फूटाचा बोळ आहे. प्रतिवादीच्या जागेच्या पश्चिमेस वादी क्र १ ने दोन पत्र्याची एक खोली बांधली आहे व त्यामध्ये बांधकामाचे पडीक सामान ठेवलेले आहे. मला माहिती नाही की, प्रतिवादीच्या घराला लागून पश्चिमेस वादीची जागा नाही किंवा कसे.

३. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२१ च्या घटनेबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीच्या बांधकामामुळे वादींना येणेजाणेसाठी अडथळा होत आहे असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र १ माझा साडभाऊ असल्याने मी त्याच्या बाजुने साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वाचून दाखवले बरोबर आहे,

JAIN AKHIL OMPRAKASH
Digitally signed by JAIN AKHIL OMPRAKASH
Date: 2024.12.17 12:31:42 +0530

(अखिल जैन)

दिनांक - १७/१२/२०२४.

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.